# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि. वि. वि. 13563 / दिनांक: 18-10-2022

अति तात्काळ/कालमर्यादेत

## परिपत्रक

विषय :– कोवीड– १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता " सेतु अध्ययन उपक्रम " राबविण्याबाबत

संदर्भ :–१. विद्यापीठाचे पत्र क्रमांक /गों. वि./म. वि.वि. वि./३४५३/२०२२ दिनांक ३०/०९/२०२२

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पत्र क्रमांक संकिर्ण–२०२०/प्र. क्र. २१७/विशि–३ दिनांक २४ ऑगस्ट २०२२ प्राप्त दिनांक ०१/०९/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या संदर्भिय पत्रान्वये कोवीड – १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता " सेतु अध्ययन उपक्रम " राबविण्याकरिता निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन व पत्रामधील कार्यपध्दतीनुसार महाविद्यालयानी सदर उपक्रम महाविद्यालयामध्ये राबविण्याची कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करण्याबाबत संदर्भीय पत्र क्रमांक १ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आजतागायत विद्यापीठाकडे सादर केलेला नाही ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

करिता सदर परिपत्रकाव्दारे पुनश्च कळविण्यात येते कि, उक्त विषयाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अतितात्काळ दिनांक २०/१०/२०२२ पर्यंत **college.section@unigug.ac.in** या ई–मेल आय–डी वर **Soft Copy** व **Hard** कॉपीसह यथाशिघ्र विद्यापीठात सादर करावी. जी महाविद्यालये " सेतु अध्ययन उपक्रम " बाबतची माहिती सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर शासन व विद्यापीठाकडुन कार्यवाही करण्यात आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव/ प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी.

सहपत्र :– संदर्भिय पत्र

( डॉ. अनिल के. हिरेखन )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

गो.वि./म.वि. वि. वि. /३४५३/२०२२ दिनांक:३० /०९/२०२२

*अत्यंत महत्वाचे*

## परिपत्रक

विषय :– कोवीड– १९ कालवधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता " सेतु अध्ययन उपक्रम " राबविण्याबाबत

संदर्भ :– उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पत्र क्रमांक संकिर्ण–२०२०/प्र. क्र. २१७/विशि–३ दिनांक २४ ऑगस्ट २०२२ प्राप्त दिनांक ०१/०९/२०२२

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या संदर्भिय पत्रान्वये कोवीड – १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता " सेतु अध्ययन उपक्रम " राबविण्याकरिता निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन व पत्रामधील कार्यपध्दतीनुसार महाविद्यालयानी सदर उपक्रम महाविद्यालयामध्ये राबविण्याची कार्यवाही घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

सहपत्र :– संदर्भिय पत्र

( डॉ. अनिल के. हिरेखन )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
प्र-कुलगुरू कार्यालय
आवक क्र............. दि...........
जावक क्र 2476 दि. 30/08/22

जावक 2171 30/8

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१
Email ID:- vishi३-hted@mah.gov.in hted.vishi३-mh@gov.in

---

क्रमांक:-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२१७/विशि-३ दिनांक:- २४ ऑगस्ट, २०२२

प्रति,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे
२. मा. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३. मा. कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
४. मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व ... विकास विभाग
आवक क्र. 3645 दिनांक 01/9/22
जावक क्र............. दिनांक..............

विषय:- कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात.

संदर्भ:- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२२/ कोविड-१९/मवि-१/१०८१२, दि. २२ ऑगस्ट, २०२२

महोदय/ महोदया,

कोविड-१९ साथीच्या कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता त्यांचे शैक्षणिक नुकसान / शैक्षणिक कमी भरुन काढण्याच्या दृष्टीने सेतू अध्ययन उपक्रम राबविण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु यांच्यासमवेत दि. २०/०८/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीत सर्वच कुलगुरुंनी असे नमूद केले की, ऑनलाईन पध्दतीने अध्ययन-अध्यापन प्रकियेमध्ये शिक्षणाचा अपेक्षित दर्जा राखता येण्यामध्ये काही मर्यादा आल्या असल्याचे निरीक्षण नोंदविले असून विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययननिष्पत्ती साध्य झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच सदरहू घटकांसाठी अधिक अध्यापनाची आवश्यकता असल्याचे कुलगुरुंनी नमूद केले. सदर बाब लक्षात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमधील उणीव दूर करण्यासाठी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक कमी भरुन काढण्यासाठी Bridge Course असावा अशी आवश्यकता सर्वच कुलगुरुंनी व्यक्त केली. काही विद्यापीठांनी याबाबत कार्यवाही सुरु केली असल्याचे सुध्दा नमूद केले. तथापि, सर्व विद्यापीठांमध्ये समान कार्यपध्दती असावी यादृष्टीने संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सदर बैठकीत निर्देश देण्यात आले होते. त्यासअनुसरुन संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत असून त्यानुसार तातडीने विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**उपक्रमाचे नाव :** कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता सेतू अध्ययन उपक्रम

(मा. कुलसचिव)
ProVC
29.08.2022

श्री बोरकर
01/9/22

उद्दिष्टे :-

१. पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची सत्र व विषयनिहाय प्रत्यक्ष अध्यापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांची निवड करणे.

२. यासाठी निदानात्मक चाचणीचे आयोजन करुन चाचणीच्या निष्कर्षांचे आधारे घटक निश्चिती करणे.

३. सदरहू चाचणीच्या विश्लेषणावरुन उपायात्मक प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन उपक्रम प्रात्यक्षिकांसह राबविणे.

४. उपायात्मक अध्ययन-अध्यापन करुन विद्यार्थ्यांचा संबंधित विषयाचा अध्ययन स्तर उंचावणे.

**उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती :**

१. सदर उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला सर्व विषयांसाठी राबविण्यात यावा. सदर उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल.

२. सदर उपक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्रत्येक विषय शिक्षकाची राहील.

३. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुख यांनी सदर उपक्रमासाठी स्वतंत्र समिती गठीत करावी.

४. पूर्वज्ञानावर आधारित नवीन सत्रातील विषयज्ञान आकलन करण्यासाठी विषयज्ञान, संकल्पना स्पष्टता, आकलन, उपयोजन, पृथ:करण/ संश्लेषण आणि टीकात्मक मूल्यमापन या स्तरांवर आधारित पूर्वज्ञान तपासणारी निदानात्मक चाचणी आयोजित करावी.

५. निदानात्मक चाचणी ही संबंधित विषयाच्या अध्यापकाने सदरहू विषयासाठी आवश्यक असणाऱ्या पूर्वज्ञानावर तयार करावी. ज्यायोगे सदरहू चाचणीच्या निकालाद्वारे विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करणे सुलभ होईल.

६. विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करुन सदरहू घटकासाठी गरजेप्रमाणे अध्यापन तासिकांचे वर्ग व अध्यापन पध्दतीचे नियोजन करुन समृध्द उपायात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रमाची योजना तयार करावी. यामध्ये ज्या विषयांना प्रात्यक्षिक (Practicals) असतात अश्या प्रात्यक्षिकांचा सुध्दा समावेश असावा.

७. प्रत्येक विषयासाठी अध्यापनाच्या आवश्यकतेनुसार किमान ०५ तासिका असाव्यात.

८. सदरहू सेतू अध्ययन उपक्रमाचे वेळापत्रक विभाग समिती / महाविद्यालयांनी तयार करुन वेळापत्रकाची अंमलबजावणी विभाग / महाविद्यालय यांच्या स्तरावर सत्र प्रारंभी तात्काळ करावी. ज्या ठिकाणी यापूर्वी सत्र सुरु झाले आहे त्या ठिकाणी पुढील अध्यापन सुरु करण्यापूर्वी करण्यात यावे.

९. पूर्वज्ञान समृध्द होण्यासाठी सदरहू घटकांना अनुरुप असे संदर्भ ग्रंथ, साहित्य, वेब साहित्य इत्यादी बाबतची यादी उपलब्ध करुन देण्यात यावी.

१०. उपायात्मक अध्यापन प्रक्रियेनंतर निदानात्मक कसोटीचे आयोजन करुन अपेक्षित ज्ञान आकलन झाले असल्याची खातरजमा करण्यात यावी.

११. सदरहू उपक्रमात समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

१२. सदर उपक्रम प्रथम सत्रासाठी १५ ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्यात यावा. व्दितीय सत्र सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे.

१३. सदर उपक्रम उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण मधील सर्वच अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात यावा. यासाठी कोणताही स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

आपला,

(अ.म.बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

४. निवडनस्ती (विशि-३)